वैचारिक क्रांतीचा अग्रदूत
देशोन्नती Live बुलडाणा
गुरूवार, दि.१९ डिसेंबर २०१९ पृष्ठे ८
https://www.deshonnati.com

# हजरत गौस-ए-आजम दस्तगीर बाबांचा वार्षिक उर्स शरीफ आणि निशाण

**सिंदखेड राजा** ■ शहर प्रतिनिधी

सर्व धर्म समभावचे प्रतिक हज़रत गौस-ए-आजम दस्तगीर बाबांच्या वार्षिक उर्स शरीफ आणि निशाण १९ ते २१ डिसेंबरला सिं.राजा येथे प.पु.गुरुवर्य अल्हाज असदबाबा यांच्या प्रमुख मार्गदर्शनात साजरा होणार आहे. या सोहळानिमित्त विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवर्य अल्हाज असद बाबा हे गेल्या ४० वर्षांपासून रुग्ण सेवा तथा राष्ट्रीय एकात्मताचे पवित्र कार्य करत आहे. जगामध्ये शांती, समता, बंधुता आणि सर्व धर्मांना एकत्र आणण्याचे कार्य असद बाबा करीत आहे.१९ डिसेंबर गुरुवारी राष्ट्रीय एकता सर्व धर्म समभावची शाही चादर आणि निशाण मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत दर्गावर चढविण्यात येईल.

अल्हाज असद बाबांना यावर्षीचा महात्मा गांधी लीडर शिप पुरस्कार हाउस ऑफ कॉमन्स लंडन येथून दीपकसिंग राजदूत तथा अध्यक्ष एनआरआय वेलफेअर सोसायटी लंडन (यूनाइटेड किंगडम चॅप्टर) ब्रिटिश पार्लमेंटच्यावतीने सिंदखेड राजामध्ये येऊन पुरस्कार प्रदान करणार आहे.

कार्यक्रमासाठी खासदार, आमदार व अनेक मान्यवर पाहुणे उपस्थितीत राहून शाही चादर आणि निशाण चढविणार आहे रात्री कव्वालीचा कार्यक्रम होणार असून नामांकित कव्वाल आपली हजेरी लावणार आहे. तसेच शुक्रवारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे.तरी जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा ही विनंती. उर्स कमिटी आयाज खान, महेश जाधव, नाजिम पठाण, अशपाक खान , जमिरोद्दिन कुरैशी, नरहरी तायडे, सिद्धार्थ जाधव यांनी केले आहे.

वैचारिक क्रांतीचा अग्रदूत

देशोन्नती Live बुलडाणा

■ गुरूवार, दि.१९ डिसेंबर २०१९ ■ पृष्ठे ८

https://www.deshonnati.com

# मोफत रोगनिदान व उपचार शिबिराचे आयोजन

**सिंदखेडराजा** ■ शहर प्रतिनिधी

येथे २० डिसेंबर शुक्रवार रोजी मोफत कर्करोग, किडनी रोग तपासणी तथा उपचार मार्गदर्शन महा-आरोग्य शिबिराचे आयोजन डॉ.अमजदखान पठाण (कर्करोग शास्त्रज्ञ मुंबई) यांनी केले आहे. गेल्या ५ वर्षापासून डॉ. पठाण शिबिराचे आयोजन करतात. २५ हजार रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतलेला आहे. सिंदखेड राजा मध्ये कर्करोग हॉस्पिटल उभारण्याचा डॉ. पठाण यांचा मानस आहे. त्यासाठी शासनाने त्यांना जागेसाठी मदत करावी अशी मागणी गावकऱ्यांची आहे. विदर्भ मराठवाडाच्या सीमेवर सिंदखेडराजा असल्याने विदर्भ सह खान्देश आणि मराठवाड्यातील गोर गरीब रुग्णांना याचा लाभ मिळणार आहे.

हज़रत गौस- ए-आज़म दस्तगीर बाबा बहुद्देशीय संस्था, आय-केअर सेंटर, सिंदखेडराजा, मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र संयुक्त राष्ट्र संघटना, अन्न आणि औषध प्रशासन विभाग बुलडाणा, बुलडाणा जिल्हा केमिस्ट आणि ड्रगिस्ट असोसिएशन, बुलडाणा जिल्हा सामान्य रुग्णालय तथा मुंबई, नाशिक, औरंगाबाद व जालना येथील प्रसिद्ध हॉस्पिटल्स च्या संयुक्त विद्यमाने तज्ञ डॉक्टर तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहे. या शिबिरामध्ये मुंबई येथील नामांकित कर्करोग (कॅन्सर) तज्ञ तथा किडनी रोग तज्ञ (नेफ्रोलोजिस्ट) आणि इतर रोग तज्ञ तपासणी व उपचारासाठी उपस्थित राहणार आहे. मुंबई येथील सुप्रसिद्ध जसलोक रुग्णालय, वाडिया बाल रुग्णालय मुंबई, एचसीजी - मानवता कॅन्सर हॉस्पिटल नाशिक, युनाइटेड सिग्मा हॉस्पिटल, पॅसिफिक हॉस्पिटल औरंगाबाद, एमआई टी हॉस्पिटल औरंगाबाद, जालना हॉस्पिटल आणि दीपक हॉस्पिटल, सानप हॉस्पिटल, समर्थ हॉस्पिटल, विश्वेश्वर हॉस्पिटल, साई हॉस्पिटल येथील डॉक्टर उपस्थित राहुन रुग्णांची तपासणी करणार आहे

महिलांसाठी ब्रेस्ट स्कॅनिंग, PAP smear test, पुरुषांसाठी तोंडाचे विकार तपासणी, फुफ्फुस, हाडाची ठिसुळता व रक्त कर्करोग तपासणी, मोफत औषध वाटप होणार आहेत.